महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२३
परीक्षा दिनांक - १७ डिसेंबर, २०२३.

**A** → संच क्रमांक

**2023**

**G18**

प्रश्नपुस्तिका क्रमांक 182493
BOOKLET NO.

# प्रश्नपुस्तिका - I
# मराठी व इंग्रजी

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | केंद्राची संकेताक्षरे | शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

1. 'पत्नी' या शब्दाला समानार्थी शब्द कोणता ?

(1) धव (2) भर्ता (3) कान्ता (4) कलत्र

2. 'वाईट कृत्य करणाऱ्याला ते उघडकीस येईल की काय याची सतत भीती वाटते' या अर्थाची म्हण कोणती ?

(1) बळी तो कान पिळी (2) चोराच्या मनात चांदणे

(3) कर नाही त्याला डर कशाला (4) दिव्याखाली अंधार

3. 'सोने' या शब्दाला पर्यायी समानार्थी शब्द निवडा.

(a) कनक (b) सुवर्ण (c) हेम (d) कांचन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (a), (b) व (d) बरोबर

(3) फक्त (c) व (d) बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर

4. खालीलपैकी देशी शब्दांचा शब्दगट ओळखा.

(1) तंबाखू, बशी, चावी, प्रीति (2) साबण, फणस, हापूस, कोबी

(3) बाजरी, चिमणी, बोका, ओसरी (4) कागद, मिठाई, नोकरी, दवाखाना

5. 'जो गरीब असतो त्याला कलेची गोडी नसते आणि ज्याला कलेची गोडी असते त्याला अनुकूलता नसते.' या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) केवल संयुक्त (2) मिश्र संयुक्त (3) मिश्र वाक्य (4) केवल मिश्र संयुक्त

6. दंड नसलेले व्यंजन शोधा.

(1) रक्त (2) कष्ट (3) अल्प (4) अर्पण

7. 'हर्ष' चा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) आनंद (2) हानी (3) खेद (4) मोद

8. 'आपली पाठ आपणास दिसत नाही', या वाक्यातील ध्वन्यार्थ पुढे दिलेल्या पर्यायातून निवडा.

(1) दुसऱ्याचे दोष दिसत नाहीत. (2) स्वत:चे दोष स्वत:ला दिसत नाही.

(3) स्वत:चे गुण स्वत:ला दिसतात. (4) दुसऱ्याचे गुण दिसतात.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

9. 'गोडवा' हा शब्द कोणत्या नामाचा प्रकार आहे ?

(1) सामान्यनाम (2) विशेषनाम (3) दर्शकनाम (4) भाववाचकनाम

10. 'मी तुला रामकडून पाच रुपये देववीन', या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

(1) भावकर्तृक क्रियापद (2) संयुक्त क्रियापद
(3) प्रयोजक क्रियापद (4) सहाय क्रियापद

11. 'पारध्याकडून मोर पकडला गेला' या वाक्यातील प्रयोगाचा उपप्रकार ओळखा.

(1) कर्तरी (2) शक्य कर्मणी (3) कर्मकर्तरी (4) भावे

12. समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| (a) | अमृत | (i) | शुक |
| (b) | पोपट | (ii) | विस्तव |
| (c) | अनल | (iii) | हिमांशू |
| (d) | चंद्र | (iv) | सुधा |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iv), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iii) (2) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(3) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii) (4) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(iv), (d)-(i)

13. अफलातून, जुलूम, कबूल हे शब्द कोणत्या भाषेतील आहेत ?

(1) इंग्रजी (2) पोर्तुगीज (3) फारसी (4) अरबी

14. खालीलपैकी कोणते देवनागरी लिपीचे वैशिष्ट्य आहे ?

(a) वर्णमालेचे वैज्ञानिक वर्गीकरण (b) एक ध्वनी, एक लिपिचिन्ह
(c) एक चिन्ह, एक ध्वनी (d) उच्चारण लेखनासाठी एकरूपता

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) सर्व पर्याय बरोबर
(3) फक्त (c) व (d) बरोबर (4) फक्त (a), (b) व (c) बरोबर

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**15.** कर्त्याची किंवा कर्माची क्रियापदाशी अशी जी जुळणी, ठेवण किंवा रचना असते, तिला काय म्हणतात ?

(1) विभक्ती (2) धातुसाधिते (3) आख्यात (4) प्रयोग

**16.** 'मुंबईस जाताना खंडाळ्याजवळ उजाडले' हे वाक्य कोणत्या प्रयोगाचे लक्षण आहे ?

(1) मिश्र संकर प्रयोग (2) कर्मभाव संकर प्रयोग

(3) भाव कर्तरी प्रयोग (4) कर्मणी प्रयोग

**17.** यावर्षी बाजारात सूर्यफुलाची खूप <u>आवक</u> आहे. या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) संगम (2) जावक (3) आयात (4) आगम

**18.** 'त्यांच्या मनात काहीतरी <u>गोम</u> आहे' या वाक्यातील अधोरेखित शब्दासाठी अयोग्य अर्थ असणारा शब्द निवडा.

(1) दोष (2) व्यंग (3) व्याधी (4) रहस्य

**19.** ज्या वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून अमुक केले असते तर अमुक झाले असते अशी अट किंवा संकेत असा अर्थ निघत असेल तर त्यास कोणत्या प्रकारचे वाक्य म्हणावे ?

(1) संकेतार्थी (2) आज्ञार्थी (3) नकारार्थी (4) विधानार्थी

**20.** खालील शब्दांपैकी कोणते सामान्यरूप चुकीचे आहे ?

(1) घशात (2) येण्याचे (3) करणेत (4) फौजांनी

**21.** 'उंचच्या उंच डोंगर चढताना लेंढे काकांच्या नाकी नऊ आले', या विधानातील वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.

(1) पायाला गोळे येणे (2) जीवात जीव येणे

(3) जीव टांगणीला लागणे (4) प्राण कासावीस होणे

**22.** "दुसऱ्याने आपल्या विरोधात तक्रार करण्यापूर्वी आपणच त्या विरोधात तक्रार करावी", हा आशय स्पष्ट करणारी म्हण ओळखा.

(1) अटकळ्या देवा दंडवत (2) आदपाव भोपळा आणि अडीच शेर तेल

(3) अवसबाई तुझ्याकडे, पुनवबाई तुझ्याकडे (4) अस्वलआधी आरोळी

**23.** शब्दशः होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला काय म्हणतात ?

(1) विशेषण (2) वाक्प्रचार (3) शब्दशक्ती (4) शब्दजाती

**24.** 'मुले मोजून पाहिली, पण ती वीसच भरली,' वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) केवल वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) मिश्र वाक्य (4) स्वार्थी वाक्य



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

25. खालील शब्दसमुहांपैकी अंशाभ्यस्त शब्दसमुह ओळखा.

(1) गेलाबिला, आंबटबिंबट, उलटासुलटा (2) रानरान, खालोखाल, मागोमाग

(3) गडगडाट, घमघम, गदगद (4) पळापळ, डगमगणे, कडकडाट

---

26. 'रसिक' हा शब्द __________ आहे.

(1) उपसर्गघटित शब्द (2) अभ्यस्त शब्द (3) प्रत्ययघटित शब्द (4) सामासिक शब्द

---

27. 'तप घालीत बसणे', या वाक्प्रचाराचा अर्थ खालीलपैकी कोणता ?

(1) तप करून बसणे (2) अंतर्मुख होऊन बसणे

(3) तपश्चर्या करणे (4) प्रार्थना करणे

---

28. पुढील शब्दांपैकी तत्सम शब्द ओळखा.

(1) उत्सव (2) पान (3) आग (4) विनंती

---

29. 'अपमान केल्यास कुणाला राग येत नाही' या वाक्याचे होकारार्थी वाक्य करा.

(1) अपमान केल्यास राग येणार नाही का ? (2) अपमान केल्यास राग का येऊ नये ?

(3) अपमान केल्यास प्रत्येकाला राग येतोच. (4) अपमान केल्यास राग का यावा.

---

30. 'तो उत्तीर्ण झाल्यामुळे सर्वांना आनंद झाला', या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) संयुक्त वाक्य (2) केवल वाक्य (3) प्रश्नार्थी वाक्य (4) उद्गारार्थी वाक्य

---

31. बंडा देसायाच्या अकाली निधनानंतर वाड्यातल्या बिऱ्हाडकरुनेच वाड्याचा ताबा मिळविला. या आशयाची योग्य म्हण ओळखा.

(1) चोराच्या मनात चांदणे (2) गोगल गाय पोटात पाय

(3) आयत्या बिळावर नागोबा (4) थेंबे थेंबे तळे साचे

---

32. 'आई बापासारखीच मुले असतात' हा आशय स्पष्ट करणारी म्हण ओळखा.

(1) अनुभवाच्या खाणी (2) बाप बेटा सवाई (3) खाण तशी माती (4) घरोघरी मातीच्या चूली

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

33. 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' या म्हणीचा अर्थ काय ?

(1) पहिल्या घासाला मधमाशी सापडली.
(2) एखादी चांगली गोष्ट सुरु होतानाच त्यात विघ्न येणे.
(3) पहिल्या घासाला आनंद झाला.
(4) पहिल्या घासाची चव चांगली असते.

---

34. नामाच्या व सर्वनामाच्या ठिकाणी संख्या सुचविण्याचा धर्म असतो त्यास __________ म्हणतात.

(1) आख्यात (2) कारकार्थ (3) पूरक (4) वचन

---

35. 'त्याने आपल्या मुलीला कालच सासरी पाठविलीन्.' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) कर्तृकर्म संकर (2) कर्तृकर्मभावे संकर (3) कर्मभावे संकर (4) कर्तृभावे संकर

---

36. धातूला विविध प्रत्यय लागून क्रिया अपुरी दाखविणाऱ्या शब्दांना काय म्हणतात ?

(1) धातू (2) धातुसाधिते (3) विशेषण (4) शक्य क्रियापदे

---

37. 'मलिन' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्दाचा खालीलपैकी कोणत्या वाक्यात उपयोग केला आहे ?

(1) स्वच्छतेचे पालन करावे.
(2) तो मळलेल्या कपड्यानिशी गावी गेला.
(3) घाणेरड्या नजरेने तो माझ्याकडे पाहात होता.
(4) निर्मळ अंत:करणाने ती कधी वागलीच नाही.

---

38. 'काल सकाळी बाजूच्या मैदानावर सचिन जोरात धावला' हे वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ?

(1) विधेय विस्तार (2) कर्म विस्तार (3) कर्मपूरक (4) विधीपूरक

---

39. 'शेतकऱ्यांना मिळणारे सरकारी कर्ज', या शब्दसमुहासाठी योग्य पर्यायी शब्द निवडा.

(1) अनुदान (2) तगाई (3) सानुग्रह (4) धनादेश

---

40. '<u>शिडीवर</u> चढून डबा काढ' या वाक्यातील अधोरेखित शब्द कोणत्या प्रकारचा आहे ?

(1) क्रियाविशेषण अव्यय
(2) शब्दयोगी अव्यय
(3) उभयान्वयी अव्यय
(4) विकल्पबोध अव्यय

---



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

41. 'वेदांश हा प्रश्न <u>विचारताच योग्य ते उत्तर ताबडतोब देणारा</u> विद्यार्थी आहे,' अधोरेखित शब्दसमुहासाठी एक शब्द सांगा.

(a) स्थिरबुद्धी (b) स्थिरमती (c) हजरजबाबी (d) मनकवडा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (d) (3) (c) (4) (d)

---

42. देवी+औदार्य या पोटशब्दापासून तयार होणारा योग्य जोडशब्द ओळखा.

(1) दैवदार्य (2) दैवीदार्य (3) देवीऔदार्य (4) देव्यौदार्य

---

43. खालील 'होकारार्थी' वाक्याचे 'नकारार्थी' वाक्य करा.

या लोकांचे अज्ञान पाहून मला दु:ख होते.

(1) या लोकांचे अज्ञान पाहून मला दु:ख होत नाही. (2) या अज्ञानी लोकांचे काय होणार ?

(3) या अज्ञानी लोकांनी शिक्षण घ्यावे. (4) या लोकांचे अज्ञान पाहुन मला सुख होत नाही.

---

44. उद्देशाचे प्रथमोपस्थित संघटक कोणते ?

(1) मूळ उद्देश्य व मूळ विधेय (2) मूळ उद्देश्य व विधेयविस्तार

(3) विधेयविस्तार व विधेयपूरक (4) मूळ उद्देश्य व उद्देशविस्तार

---

45. '__________ जगवले तरच भविष्यात प्राणवायू मिळणार आहे.' या वाक्यातील रिकाम्या जागी तत्सम शब्दाचा वापर करा.

(1) झाड (2) वृक्ष (3) रोप (4) वेल

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 46 ते 50 या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

युरोपात जसे हे घडले, तसे आपल्याकडेही घडले. पूर्वी संस्कृत ही देवभाषा म्हणून अभिजनांची भाषा होती. बहुजनांना ती समजतही नव्हती. बहुजनांना आणि स्त्रियांना ती भाषा ऐकण्याचा अधिकारदेखील नव्हता. दहाव्या–अकराव्या शतकापर्यंत प्राकृत आणि नंतर प्रादेशिक भाषा विकसित होत गेल्या. मराठी भाषेचा विकास झाल्यावर ज्ञानेश्वरांनी मराठीत 'अमृतातेही पैजा जिंके' अशी रचना करण्याची प्रतिज्ञा करून संस्कृतला आव्हान दिले; आणि संस्कृतातील तत्त्वज्ञान मराठीत आणले. लोकभाषेचा विकास प्रामुख्याने धर्माच्या द्वारा झाला. आपला धर्म बहुजनांना समजावा म्हणून जैनांनी कानडीत लिहिले, बसवेश्वरांने वचन–वाङ्मयाकरता लोकभाषेचा म्हणजे कानडीचा उपयोग केला आणि ज्ञानेश्वरांनी गीतेचे मराठीत रूपांतर केले. युरोपीय देशात ख्रिश्चन धर्मप्रचारकांना धर्माच्या प्रसारासाठी बायबलची भाषांतरे करणे आवश्यक वाटले. अशा प्रकारची भाषांतरे युरोपच्या सर्व भाषांत प्रसिद्ध झाली. ती बहुजनांना उपयोगी असल्याने ती त्यांनी उचलून धरली. त्यातूनच भाषेचा विकास होत गेला. बोली भाषा, लिखित भाषा, वाङ्मयनिर्मिती, व्यापार–उदिमाकरिता उपयोग आणि मग प्रशासकीय कामाकरता उपयोग असे हे भाषाविकासाचे टप्पे आहेत. राजांनी प्रशासकीय भाषेत बदल करून लोकभाषेचा उपयोग सुरू केला. लोकभाषांचा हा उपयोग एकत्वाची भावना निर्माण करण्यास उपयोगी ठरला. भाषा हे संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे. एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे संस्कृतीवहनाची प्रक्रिया ही भाषेद्वारेच केली जाते. त्यामुळे राष्ट्रनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यात एक समान भाषा बोलणारा समूह, हा एकाच जातीचा आहे असेही समजले जाऊ लागले. हे प्रमेय काही अंशी खरे असले, तरी पूर्णांशाने खरे नाही. भाषा, वंश आणि संस्कृती यांचे मिश्रण होऊन तत्कालीन युरोपीय राष्ट्रवादाचा ते आधार झाले. त्यातूनच युरोपातील राष्ट्रे निर्माण झाली. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स यांसारखी राष्ट्रे ही भौगोलिक प्रदेशावर आधारित होती; तर जर्मन राष्ट्रवाद हा वांशिक–भाषिक राष्ट्रवादावर आधारित होता. ज़र्मन हा इंग्लंड, फ्रान्स या देशांसारखा स्पष्ट सीमांकित देश नसल्याने जर्मनचा राष्ट्रवाद हा भौगोलिक न राहता प्रथम वांशिक आणि नंतर भाषिक अस्मितेवर अवलंबून होता. भाषिक अस्मितेवर जर्मनीचा हा वांशिक–भाषिक राष्ट्रवादाचा सिद्धांत बऱ्याच राष्ट्रांनी, विशेषत: बाल्कन राष्ट्रांनी, अवलंबिला. त्याचे परिणाम दुसऱ्या महायुद्धाच्या स्वरूपात आपल्याला पाहावयास मिळाले. जर्मन राष्ट्रवाद हा विसाव्या शतकातच आपल्याला जाणवला, तरी त्याची मुळे या वांशिक–भाषिक राष्ट्रवादात सतराव्या अठराव्या शतकांत दिसून येतात.

संस्कृतीची समृद्धी ही भाषेच्या समृद्धीवर अवलंबून असते. बोली भाषेबरोबर ती लिहिताही येणे हा दुसरा टप्पा झाला. भाषा लिखित स्वरूपात अवतरल्यावर त्या भाषेत बोलणारे लोक आपले विचार त्या भाषेत लिखित स्वरूपात आणू लागले. त्यातूनच हळूहळू वाङ्मयनिर्मिती होऊ लागली. ही वाङ्मयनिर्मिती जसजशी वाढू लागली तसतसे भाषेला सौष्ठव प्राप्त होत गेले. वाङ्मयनिर्मिती करू शकणारा समाज हा राष्ट्र ही पदवी प्राप्त करण्यास सिद्ध असतो.

---

**46.** भाषेचे अंतिम उपयोजन कोणते ?

(1) धर्मप्रसार (2) साहित्यनिर्मिती (3) दैनंदिन व्यवहार (4) प्रशासकीय व्यवहार

---

**47.** प्रारंभी युरोपीय राष्ट्रवादाचे मूलाधार कोणते होते ?

(1) लोकभाषा व वाङ्मयनिर्मिती (2) भाषांतरे आणि संस्कृती

(3) भाषा, वंश आणि संस्कृती (4) भौगोलिकता, धार्मिकता आणि भाषा

---

**48.** कोणत्याही समाजाला राष्ट्र ही पात्रता प्राप्त होण्यासाठी कोणती गोष्ट आवश्यक असते ?

(1) साहित्यनिर्मिती करण्याची क्षमता (2) धर्म आणि दैवत कल्पना

(3) लोकभाषा व संस्कृती (4) भाषांतर करण्याची क्षमता

---



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

49. सांस्कृतिक संक्रमणाचे महत्त्वाचे माध्यम कोणते ?
(1) राष्ट्रवाद (2) वंश (3) धर्म (4) भाषा

50. वेगवेगळ्या धर्मचिंतकांनी धर्मचिंतनासाठी कोणत्या भाषेचा आधार घेतला ?
(1) वैदिक भाषा (2) संस्कृत भाषा (3) प्रमाण भाषा (4) लोकभाषा

51. It is always desirable (a) / to listen to the advice (b) / who have extensive practical experience (c) / No error (d)

Spot the error in the above sentence. If no error choose (d).
(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

52. (a) Neither did men nor women go out at night.
(b) Not only the kitten was wet but cold also.
(c) No sooner does the curtain go up when the children watch the play closely.

Select the grammatically **correct** sentence/s.
(1) Only (a) (2) Only (b)
(3) Only (a) and (b) (4) Only (c)

53. __________ pronouns are always singular.
Which of the following correctly fills in the blank in the sentence above ?
(a) Reciprocal (b) Relative (c) Personal (d) Distributive

**Answer Options :**
(1) (c) only (2) (a) only (3) (d) only (4) both (b) and (d)

54. Choose the idiom that means "to reveal a secret or confidential information".
(1) Break the ice. (2) Let the cat out of the bag.
(3) Bite the bullet. (4) Hit the nail on the head.

55. Choose the **correct** sentences :
(a) Try and come tomorrow.
(b) I felt sure he would die and his money would go to his son.
(c) The pundit read the first mantra and the bridegroom read the second.

**Answer Options :**
(1) (c) only (2) (b) only (3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

56. Find the **correct** indirect speech sentence for -
He said, "I shall go home."

(1) He says that he shall go home. (2) He said that he shall go home.
(3) He said that he would go home. (4) He says that he would go home.

57. Had he not sent money on time, the poor farmer __________ his son ?
Select the **correct** alternative to complete the sentence meaningfully.

(1) would lost (2) would have lost
(3) would have been lost (4) will have lost

58. Fill in the blank.
Many people are painting __________.

(1) white their houses these days (2) these days white their houses
(3) their houses white these days (4) their houses these days white

59. After years of guilt, she finally decided to make a clean breast of her involvement in the scandal and confessed everything to the authorities. What does the phrase "make a clean breast of" mean ?

(1) To clean something thoroughly (2) To reveal or confess something
(3) To make heartfelt apology (4) To face the consequences of one's actions.

60. (a) The doctor advised his patient where he should go for a holiday.
(b) The judge wondered who had committed the crime.
(c) It is a pity that you couldn't come.
(d) Although aeroplanes sometimes crash, accidents are rare.

Identify the sentence/s with adverbial clause.

(1) Only (a) and (c) (2) Only (b) and (d)
(3) Only (a) and (b) (4) Only (d)

61. Fill in the blank with the **correct** option given below :
'Manisha will __________ the prize which is declared yesterday.'

(1) Except (2) Accept (3) Acsept (4) Exept

62. Find the **correct** option of the question tag for - 'They will fail.'
(a) They will fail, will they ? (b) They will fail, would they ?
(c) They will fail, won't they ? (d) They will fail, will not they ?

**Answer Options :**

(1) (a) and (b) (2) (b) and (d) (3) (c) and (d) (4) only (c)



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**63.** 'I knew that he was ill, but I did not know that he suffered from cancer.'

The above sentence exemplifies _________.

(a) Compound sentence (b) Compound-Complex sentence

(c) Complex sentence (d) Simple sentence

**Answer Options :**

(1) (c) only (2) (b) only (3) (a) only (4) (d) only

---

**64.** Choose the **correct** sentences :

(a) Can you tell me why you're interested in an administrative career ?

(b) Can you tell me why you are late ?

(c) Do you think does your name indicate your personality ?

**Answer Options :**

(1) (c) only (2) (a) and (b) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

**65.** Fill in the blanks with the **correct** pair of articles in the following sentence.

_________ death of the Prime Minister is being grieved by many people in _________ UK.

(1) the, an (2) the, the (3) a, an (4) a, the

---

**66.** Choose the **correct** idiom and fill in the blank.

The President was _________ and lived beyond his tenure.

(1) hale and hearty (2) quite a catch

(3) talking by the dozen (4) head over heals

---

**67.** Choose the correct meaning of the underlined word in the sentence given below :

'The staff members are <u>conversant</u> with the issues.'

(1) Frosty (2) Unfriendly (3) Unknown (4) Familiar

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

68. Select the correct meaning of the underlined idiom in the given sentence :

"My father burnt his fingers by interfering in his neighbour's affair."

(1) Got opportunity for revenge. (2) Got himself into trouble.

(3) Got injury on fingers. (4) Got worried for his fingers.

---

69. Choose the one word which is closest to the opposite in meaning of the underlined word in the given sentence :

"The leader was pragmatic in his approach to the peoples' problems."

(1) Indefinite (2) Vague (3) Optimistic (4) Idealistic

---

70. Identify the **correct** sentences :

(a) I met Renu after I had finished my work.

(b) When I first seeing him, I thought he was a lawyer.

(c) He joined after had his dinner.

**Answer Options :**

(1) (a) only (2) (a) and (b) only

(3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

71. Find out the meaning of the word underlined in the following sentences :

(a) She is forever interrupting the conversation.

(b) She has left him forever.

**Answer Options :**

(1) (a) Previously (b) Currently (2) (a) Officially (b) Previously

(3) (a) endlessly (b) Permanently (4) (a) Permanently (b) endlessly

---

72. Identify the verb form of the underlined word in the following sentence.

Swimming is a good exercise.

(1) Infinitive (2) Gerund (3) Phrase (4) Clause

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**73.** Choose the **correct** option for the underlined word in the following sentence.

The government must <u>cut down</u> its expenditure.

(1) obtain (2) increase (3) reduce (4) stop

---

**74.** Choose the **correct** reported speech of the following sentence.

He said, "I do not wish to see any of you; go away."

(1) He said that he did not wish to see any of them and ordered them to go away.
(2) He told that he did not wish to see any one of them and punished them to went away.
(3) He exclaimed them that he did not wish to see them and even told them to go away.
(4) He said to them that he did not wish to see anyone of them and told them to go away.

---

**75.** Choose the **correct** sequencing of the following sentence :

The students are

(a) with the help (b) for last two hours
(c) of the teacher (d) solving the questions

**Answer Options :**

(1) (d), (c), (a), (b) (2) (d), (a), (c), (b) (3) (d), (a), (b), (c) (4) (d), (b), (c), (a)

---

**76.** Choose the one word substitute for 'people living in the same age.'

(1) Delegate (2) Cosmopolitan (3) Curator (4) Contemporaries

---

**77.** "After years of searching for answers, she had an epiphany and finally understood the true meaning of happiness." Which phrase represents the word "epiphany" ?

(1) "A sudden realization or insight."
(2) "A feeling of confusion or uncertainty."
(3) "A state of complete contentment."
(4) "A strong sense of empathy".

---

**78.** 'He must be asleep <u>for</u> there is no light in his room.'

The underlined conjunction in the sentence above expresses __________ and hence is called __________ conjunction.

Which one of the following correctly fills in the blanks in the sentence above ?

(a) inference, illative (b) addition, copulative
(c) contrast, adversative (d) choice, alternative

**Answer Options :**

(1) (c) only (2) (a) only (3) (d) only (4) (b) only

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

FB / IG / TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

79. Everybody __________ speak the truth.

Complete the sentence by choosing the **correct** alternative.

(1) should (2) would (3) will (4) may

80. Match the following pairs with the **correct** meaning :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Ignorant | (i) | Stubborn |
| (b) | Imminent | (ii) | Uniformed |
| (c) | Obstinate | (iii) | Wise |
| (d) | Prudent | (iv) | Approaching |

**Answer Options :**

(1) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(iii) (2) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii)

(3) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(i), (d)-(iv) (4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iii), (d)-(iv)

81. Choose the meaning of the underlined idiom :

How can you trust a man who <u>plays fast and loose</u>.

(1) Corrupt nature (2) Who is not existing

(3) Vicious (4) Says one thing and does another

82. (a) It is I who am to blame.

(b) It is I who is to blame.

(c) It is me who is to blame.

(d) It is I who is to be blamed.

Which of the above is/are the **correct** sentence/sentences in respect of Relative Pronoun agreement ?

(1) (b) only (2) both (a) and (d) (3) (a) only (4) (c) only

83. Match the words from '**A**' with their **correct** meaning from '**B**'.

| | 'A' | | 'B' |
|---|---|---|---|
| (a) | Annihilate | (i) | One who walks in sleep |
| (b) | Celibacy | (ii) | One incapable of being tired |
| (c) | Indefatigable | (iii) | The state of remaining unmarried |
| (d) | Somnambulist | (iv) | To destroy completely |

**Answer Options :**

(1) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv) (2) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iii), (d)-(iv)

(3) (a)-(iv), (b)-(i), (c)-(iii), (d)-(ii) (4) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

84. Find out the **correct** meaning of the underlined idiom in the given sentence :

"Why are you hanging back ? You sing as well as anyone else."

(1) To hesitate to proceed (2) To repeat
(3) To break the voice (4) To come late

---

85. "If I had wings, I would come flying to you."

Which of the following conditions is expressed by the sentence above ?

(a) Impossible condition (b) Improbable condition
(c) Probable condition (d) Likely condition

**Answer Options :**

(1) (d) only (2) (a) only (3) (c) only (4) (b) only

---

86. Select the idiom that means "to try to achieve something that is difficult or unlikely."

(1) Turn over a new leaf. (2) Throw in the towel.
(3) Beat the dead horse. (4) Reach for the stars.

---

87. 'Those who are ________ in the art of flattery make a rapid progress in their life'.

Select the **correct** word to make the sentence meaningful.

(1) adopt (2) adept (3) adapt (4) about

---

88. Find out the **correct** meaning of the underlined idiom in the given sentence :

"Unless a poet is in his element, he cannot write good poetry."

(1) In his home (2) In his job (3) In his (4) In the right mood

---

89. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Demonstrative pronouns | (i) | myself, herself |
| (b) | Emphatic pronouns | (ii) | what, which |
| (c) | Interrogative pronouns | (iii) | anyone, everybody |
| (d) | Indefinite pronouns | (iv) | This, that |

**Answer Options :**

(1) (a)-(iii), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iv) (2) (a)-(iv), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iii)
(3) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(iii) (4) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

90. Identify the wrongly spelt word/s from the following words.

(a) Accept (b) Anciant (c) Attract (d) Arrive

**Answer Options :**

(1) (b) and (d) (2) Only (a) (3) (b) and (c) (4) Only (b)

---

91. Identify the grammatically **correct** sentence/s.

(a) He is the man whom we all respect.

(b) I don't know why she like dogs.

(c) His endeavours needs to be rewarded.

(d) Give me some food which I may eat.

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (a) and (d) only (4) (a) and (c) only

---

92. Find the **correct** synonym for the word, "Tranquil".

(1) Agitated (2) Angry (3) Quiet (4) Disturbed

---

93. Find out the **correct** option for the following matches :

| | **(A)** | | **(B)** |
|---|---|---|---|
| (a) | Altar | (i) | Pretence, false show |
| (b) | Alter | (ii) | Place of worship |
| (c) | Affection | (iii) | To change |
| (d) | Affectation | (iv) | Love, dedicate, emotions of liking |

**Answer Options :**

(1) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv) (2) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

(3) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(iv), (d)-(i) (4) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iii)

---

94. The politicians response to the accusation simply begged the question and failed to provide a clear answer. What does the phrase "to beg the question" mean ?

(1) To ask for a favour or assistance.

(2) To avoid answering the question directly.

(3) To make a logical fallacy by assuming the conclusion in premise.

(4) To question someone's authority or credibility.

---



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**95.** Choose the **correct** sentences.

(a) Her work is superior than her brother's.

(b) This photograph is the better of the two.

(c) This little girl is better than clever.

**Answer Options :**

(1) (b) only
(2) (a) and (b) only
(3) (b) and (c) only
(4) (a), (b) and (c)

---

**Read the following passage carefully and answer the questions from 96-100 given below :**

Data Management is one of the hardest and costliest tasks every organization faces. The fact that organizations appoint a Chief Data Officer (CDO) shows how much importance they give to managing data - its treatment, classification, analysis, security and compliance. This is where Deep Learning (DL) shines as a perfect data management strategy when employed with the right set of tools.

While DL has been around for a while, the recent popularity of Chat GPT brings it back to being a hot topic in the world of AI. Deep Learning is a subset of Machine Learning (ML) and is based on how the human brain is structured and works. DL uses artificial neural networks to learn from large amounts of data. It gets the name 'deep' because it leverages multiple layers of interconnected neurons to process and learn from the data. DL algorithms are capable of learning complex patterns in images, audio and text. Deep learning uses large amounts of unlabelled data to learn the underlying structure and patterns in data. It is an unsupervised learning module that does not require labelled data to start learning from.

Deep Learning gained popularity in the 1980s with the development of back-propagation - a technique for training neural networks. In the 2000s the evolution of advanced techniques with respect to dropout and rectified linear units (ReLU) helped address core challenges. In 2012, AlexNet, a convolutional neural network, focused on image recognition, won awards and regained popularity for mainstream uses in Natural Language Processing, speech recognition and autonomous vehicles.

Some common use cases of Deep Learning are listed below :

(a) **Image Recognition :** Classification of images leveraging DL algorithms is being done across healthcare institutions for the diagnosis of diseases.

(b) **Natural Language Processing :** When integrated with DL algorithms, opens up use cases like chatbots, machine translation and voice assistants.

(c) **Speech Recognition :** DL algorithms help transcribe spoken language for use cases like speech-to-text transcription and voice assistants.

(d) **Fraud Detection :** Deep learning algorithms help to keep a lookout for fraudulent transactions in banking and finance.

(e) **Autonomous Vehicles :** DL algorithms help to navigate the surroundings in autonomous vehicles, enabling real-time decisions to be made while these cars are on the road.

As the 'deep' in Deep Learning represents the depth of layers in neural networks, a neural network that consists of more than three layers is considered a deep learning algorithm. Deep Learning networks are feed-forward models but they can be trained to back-propagate as well. The latter is especially useful to provide a feedback on errors so that the algorithm can be corrected appropriately.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

**96.** Deep Learning algorithms can be corrected on the basis of error-feedback provided by ________. Which of the following correctly fills the blank in the sentence above ?

(a) Layers of interconnected neurons.
(b) Fraudulent transactions in banking.
(c) Back-propagation.
(d) Data Management System (DMS).

**Answer Options :**

(1) (b) only (2) (a) only (3) (d) only (4) (c) only

---

**97.** Basically speaking Deep Learning is a ________.

(a) Neural Module (b) Hot topic in the world of Artificial Intelligence (AI)
(c) Data Management Strategy (d) Back-Propagation technique

**Answer Options :**

(1) (d) only (2) (c) only (3) (a) only (4) (b) only

---

**98.** Deep Learning plays a very important role in ________.

(a) identifying the structure of human brain.
(b) the treatment, classification, analysis and security of data.
(c) controlling the dropout and Rectified Linear Units (ReLU).
(d) measuring the depth of layers in neural networks.

**Answer Options :**

(1) (c) only (2) (b) only (3) (a) only (4) (d) only

---

**99.** One important feature of Deep Learning is that ________.

(a) Deep Learning requires a Chief Data Officer (CDO).
(b) Deep Learning is a module not requiring labelled data to learn from.
(c) Deep Learning is a subset of Artificial Intelligence (AI).
(d) Deep Learning is more efficient than Machine Learning (ML).

**Answer Options :**

(1) (d) only (2) (c) only (3) (b) only (4) (a) only

---

**100.** Deep Learning is a part of ________.

(a) AlexNet (b) ChatGPT
(c) Machine Learning (ML) (d) Natural Language Processing (NLP)

**Answer Options :**

(1) (c) only (2) (b) only (3) (d) only (4) (a) only

---

- o O o -

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षककाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** ''अंगावर काटा उभा रहाणे'' या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) अतिशय भिती वाटणे'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

SEAL

FB/IG/TG @mpscmaterial www.mpscmaterial.com